ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal



# तिफण

वर्ष : ११ वे अंक : २ रा व ३ रा
जुलै ते डिसेंबर – २०२०

## लोककला विशेषांक

Scanned by CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष अकरावे, अंक- २रा व ३रा, जुलै-डिसेंबर २०२० (जोडअंक)

UGC Care Listed Journal

ISSN 2231 - 573X

- संपादक -

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,

हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,

मोबा. ९४०४०००३९८

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृ.क्र. |
|---|---|---|
| * | लोककला विशेषांकाच्या निमित्ताने... - डॉ. शिवाजी हुसे | |
| * | संपादकीय - प्रा. डॉ. चंद्रशेखर कणसे (अतिथी संपादक) | |
| १. | 'कीर्तन' समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम: एक अभ्यास - डॉ. चंद्रशेखर कणसे (परळी वैजनाथ, बीड) | ९ |
| २. | महाराष्ट्रातील लोककला : कीर्तन - प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस (दापोडी, पुणे) | १८ |
| ३. | वारकरी दिंडी लोककला : एक आनंदयात्रा - धन्यकुमार प्रल्हाद तारळकर (ता. फलटण जि. सातारा) | २४ |
| ४. | 'सोंगी भारूडी भजन' - डॉ. आनंद बल्लाळ (आजरा, कोल्हापूर) | ३२ |
| ५. | प्रयोगात्मक लोककलाप्रकार - 'भारूड' - डॉ. नाना झगडे (पुरंदर) | ३९ |
| ६. | विदर्भातील झाडीपट्टी येथील लोककला 'दंडार' - प्रा. अमृता डोरलीकर (नागपूर) | ४७ |
| ७. | महाराष्ट्रातील लोककला 'बोहडा' - डॉ. भास्कर शेळके (अकोले) | ५२ |
| ८. | गोमंतकीय लोककला : विशेष संदर्भ 'धालोत्सव' - डॉ. नीता तोरणे (पेडणे, गोवा) | ५५ |
| ९. | 'गोंधळ : स्वरूप आणि आविष्कार' - डॉ. पांडुरंग भोसले (हडपसर, पुणे) | ६७ |
| १०. | महाराष्ट्रातील लोककला : 'गोंधळ' - डॉ. पद्माकर तामगाडगे (मुंबई) व प्रा. राजू शनवार (ठाणे) | ७१ |
| ११. | महाराष्ट्राचे विधिनाट्य 'गोंधळ' आणि 'जांभूळ आख्यान' - प्रा. शिल्पा नेवे (मुंबई) | ७५ |
| १२. | 'गोंधळ' कला प्रकाराचे बदलते स्वरूप - डॉ. जयदेवी पवार (बाभळगाव, ता. जि. लातूर) | ८९ |
| १३. | गोंधळ : महाराष्ट्राची लोककला - डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग (अहमदनगर) | ९५ |


Scanned by CamScanner

# प्रयोगात्मक लोककलाप्रकार - भारूड

- डॉ. नाना झगडे,
सहयोगी प्राध्यापक
वाघीरे महाविद्यालय सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे.

लोकरंजनातून लोकशिक्षणाचे कार्य करण्याचा हेतूने 'भारूड' हा लोककला प्रकार प्रचलित झाला. बहुतेक लोककला या धार्मिक विधी कर्मातून निर्माण झाल्या आहेत. लोककलेतील वासुदेव, बाळसंतोष, वाघ्या-मुरळी, गोंधळी, भराडी, पोतराज, कडकलक्ष्मी, भुत्या, पिंगळा, बैरागी, बहिरूपी, सोंग, दशावतार, ललित, दंडार, तमाशा अशा लोककला प्रकारांपैकी 'भारूड' प्रोगात्मक लोककला प्रकार आहे. भारूडाचे भजनी भारूड, सोंगी भारूड आणि कूट भारूड असे प्रकार मानण्यात येतात. भारूड म्हटले की संत एकनाथ आठवतात. संत ज्ञानदेव, संत नामदेव, तुकाराम, रामदास इत्यादींनी भारूडांची रचना केली आहे. पण संत एकनाथांनी भारूड लोकप्रिय केली. वेद, उपनिषदे यातील तत्वज्ञान सामान्य लोकांना सोपे करून सांगण्यासाठी भारूडांची निर्मिती करण्यात आली. समाजात अस्तित्वात असलेली रूपके त्यांचे सोंग घेऊन त्यांच्याच भाषेत अध्यात्म सांगण्याचे काम संतांनी केले. त्यासाठी भुत्या, नाभिक आंधळा, बहिरा, मुका, बहुरूपी, गोंधळी, कोल्हाटीन, वासुदेव, जोशी, पिंगळा, वैदीण, महार-महारीण, माळी अशा अनेकाविध रूपकांचा संतांनी वापर केला. म्हणून भारूडाला रूपकामधून धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सांगणारी लोककला म्हटले जाते.

**भारूड शब्दाची व्युत्पत्ती :** भारूड या शब्दाची व्युत्पत्ती पाहिल्यास भारूड हा शब्द प्राचीन काळापासून प्रचलित असल्याचे दिसते. सर्वात जुना मानला जातो त्या 'महाराष्ट्र भाषेचा कोश' यामध्ये 'सांगू लागेल असा एकाकी संपायचे नाही आणि समजून येणारासही एकाकी पूर्वापार संघाने जुळून आकलन होऊ नये, असे जे लांबच लांब सांप्रत झालेले वर्तमान किंवा पुरातन कवींनी बांधलेली कथा, शास्त्र, गोष्ट, इ.'[१] अशी भारूडाची व्याख्या दिली आहे. यावरून भारूडाचे लांबच लांब, गुंतागुंतीची, कंटाळवाणी वृत्तान्तकथा, अवघड कूट कविता, लेख, रूपक इत्यादी. असे भारूडाचे स्वरूप असल्याचे दिसते.' 'बहुचा' अपभ्रंश 'भा' किंवा 'भो असा होतो मूळचा शब्द 'बहरुढ' पासून 'भारूड' म्हणजे लोकप्रिय असे गीत'[२] ल. रा. पांगारकर यांनी 'बहरुढ' या शब्दापासून भारूड या शब्दाची



Scanned by CamScanner

उत्पत्ती सांगितली आहे. महानुभाव संप्रदायातील नारायण पंडित यांच्या 'ऋद्धिपूरवर्णन' या ग्रंथातील संदर्भानुसार 'भारूड' म्हणजे 'धनगर' असा ही अर्थ सांगितला आहे. भराडयांचे गीत म्हणजे भारूड. भराडी जातीचे लोक गातात ते भारूड. हे स्पष्ट करत ना. गो. नांदापूरकर पंचतंत्रातील भारूंड द्विमुख पक्षाचा संदर्भ देत म्हणतात, 'भारूड या गीत प्रकाराचा व एक काय द्विमुख पक्षाचा संबंध मोठा चमत्कारीक वाटतो पण मराठीतील भारूडाने ही ही कल्पना आत्मसात केली आहे. भारूड हे द्विमुख असतेच मुळी. त्याची दोन तोंडे म्हणजे त्याचे दोन अर्थ. भारूडाचे शरीररचना (शब्दरचना) एकच असले तरी त्याचे दोन अर्थ असतात, एक वाच्यार्थ व दुसरा लक्ष्यार्थ एक व्यवहारिक व दुसरा पारमार्थिक.'[३] नांदापूरकर यांच्या वरील विधानात भारूडाचे स्वरूप स्पष्ट होताना दोन अर्थ प्रकट करण्याचा क्षमते बरोबरच अंगिभूत रूपकात्मक, नाट्यामयता हा विशेष ही स्पष्ट होतो. 'भारूड' हा शब्द वेदांइतका जुना असल्याचे संदर्भ सापडत असले तरी पण भारूड हा काव्यप्रकार मात्र मध्ययुगीन वाङमयातच सापडतो. संतांनी त्यांच्या रचनेसाठी भारूड ही संज्ञा वापरली नाही. भारूडासाठी संतांनी 'रूपक' ही संज्ञा वापरली आहे.

**भारूडाचे विषय :** प्रबोधनपर, जाती-व्यवसाय वैशिष्ट्ये, व्यंगदर्शक, नाती-गोती, जागल्या, भालदार-चोपदार, दैवी, भूत-पिशाच्च, पशुपक्षी विषयक, नवल, कोडी, सण-समारंभ, उत्सव, खेळ, जोहार, अभय, जाब, संसारविषयक इत्यादी विषयावर भारूड रचना करण्यात आली आहे.

**भारूडाचा उद्देश :** भारूडाच्या निर्मितीमागील उद्देश हा मनोरंजनाच्या माध्यमातून उद्‌बोधन, प्रबोधन हा असल्याचे स्पष्ट होते. 'भारूडे ही समाजाचे आध्यात्मिक उद्‌बोधन-प्रबोधन व रंजन करण्याच्या हेतूने लिहिली आहेत. अर्थात हे निर्मिती उद्देश संतांनी स्पष्टपणे भारूडात कोठेही सांगितले नाही. असे असले तरी भारूडांच्या स्वरूपांवरून त्याचे हे निर्मिती उद्देश लक्षात येते.'[४] सुधाकर गो. चांदजकर यांच्या वरील विधानावरून निर्मितीचा उद्देश स्पष्ट होतो. यासंदर्भात डॉ. रामचंद्र ढेकणे यांचे पुढील विधान विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'प्रचलित समाजात बहुरूढ (सर्वश्रुत) असलेल्या अनेक प्रतीकात्मक भूमिकांमधून रूपकात्मक पद्धतीने मनोरंजनाबरोबरच तत्वज्ञानाचा किंवा अध्यात्माचा किंवा अध्यात्माचा अर्थ सांगण्यासाठी या संतपरंपरेतून भारूड वाड्‌मयाचा उदय झाला.'[५] रामचंद्र देखणे यांनी भारूडाचा उद्देश व उदयाची गरज स्पष्ट केली आहे. वरील दोन्ही विधानांतून आध्यत्मिक उद्‌बोधन-प्रबोधन व लोकरंजन साधण्यासाठी रूपकात्मक, नाट्यात्मक कलाप्रकाराचा वापर भारूडाच्या रूपाने संतांनी केला आहे.

**भारूडातील तत्वज्ञान :** भारतीय आध्यात्मिक तत्त्व विचारातील अद्वैत वेदान्त



Scanned by CamScanner